# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २७.०७.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २६/०७/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४१ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३०,०००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२६/०७/२०२२ रोजी दारूबंदी कायदयाअंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन औंढा ना. येथे ०१,कळमनुरी ०१,वसमत शहर ०२ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांकडुन १०.२६ लिटर दारू असा एकुण ४,२६०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २६/०७/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०८ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.
आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये
जुगार खेळवणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.२६/०७/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे हिंगोली शहर येथे ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रू. असा एकुण ३,८९०/—रू माल जप्त करण्यात आला असुनआरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपासकरण्यात येत आहे.

**अपघात :—** दिनांक २६/०७/२०२२ रोजी फिर्यादी शेख कलीम शेख सलीम व्य.व्यापार रा मिर्झा गल्ली वसमत यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत शहर येथे कलम २७९,३३७,३३८,४२७ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२१.०७.२०२२ रोजी सायंकाळी ७.०० वा सु वसमत ते कौठा जाणारे रोडवर उघडी नदीच्या पुलाच्या समोर वसमत येथे यातील बुलेट क्र एमएच ३८ यु ७७७ च्या चालकाने त्याचे ताब्यातील बुलेट भरधाव वेगात,बेदरकारपणे व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादी होन्डा शाईन एमएच ३८ ए सी ५६२९ या मोटार सायकलला पाठीमागुन जोराची धडक देवुन फिर्यादीस छातीमध्ये पाठीवर मानेच्या कमरेला मुक्कामार लागला व माझे मोटार सायकलचे शॉकप मडगार्ड,लाईट डोम, फुटले असुन १०,००० रू चे नुकसान झाले म्हणुन गुन्हा  दाखल होवुन या संदर्भात वसमत शहर पोलीस तपास करित आहेत.